पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
ईपीएबीक्स - ०२१७ २७४४७७० ते २७४४७७९ विस्तारीत क्रमांक (१३७)
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac & www.sus.ac.in



# पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता नोंदणीकृत पदवीधरांना जाहीर सूचना

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेसाठी (Senate) पदवीधर मतदारसंघाची निवडणूक सन २०२२ मध्ये होणार आहे. या निवडणूकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(न) नुसार, पदवीधर मतदार यादीमधील दहा पदवीधर अधिसभेवर निवडून देण्याचे आहेत.

१) नोंदणीकृत पदवीधरांनी अधिसभेसाठी (SENATE) मतदार व उमेदवार म्हणून हक्क प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३१ (५) नुसार, पदवीधर मतदार यादीत नांव नोंद करणे आवश्यक आहे.

२) विद्यापीठाच्या सन २०१०, २०१५, २०१७ व नव्याने सन २०२२ मध्ये नोंद केलेल्या पदवीधरांनी **दि.०४ ऑगस्ट, २०२२ पर्यंत** पदवीधर मतदार यादीत **ऑनलाईन पध्दतीने** नांव नोंदणी करावयाची आहे.

३) मतदार यादीत नावाची नोंद करण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावरील **"विद्यापीठ निवडणूक २०२२** (University Election २०२२)" या लिंकखाली सन २०१०, २०१५ व २०१७ मधील नोंदणी केलेल्या पदवीधरांसाठी व सन २०२२ मध्ये नोंदणी केलेल्या पदवीधरांसाठी स्वतंत्र लिंक देण्यात आलेली आहे.

४) पदवीधरांच्या सोयीसाठी त्यांचा पदवीधर नोंदणी क्रमांक पाहण्यासाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या याद्या **"विद्यापीठ निवडणूक २०२२** (University Election २०२२)" या लिंकखालील Register of Registered Graduates या ठिकाणी पहावयास मिळतील.

५) **पदवीधर मतदार नोंदणी करण्यासाठी कोणतेही शुल्क भरावयाचे नाही.**

पदवीधर मतदारयादीत नाव नोंद करण्याची अंतिम तारीख **दि.०४ ऑगस्ट, २०२२** आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार, निवडणूकीची प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावयाची असल्याने पदवीधर मतदार नोंदणीसाठी मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. सोविसो/सनिवि/९९
दिनांक: 28 JUL 2022

प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी